पुढारी

# कमला कॉलेजमध्ये 'रोजगार संधी'वर वेबिनार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण अभ्यास केंद्र एमबीए विभाग व कमला कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बी.व्होक पदवीनंतरच्या एमबीएमधील शैक्षणिक व रोजगार संधी' या विषयावर वेबिनार झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर होत्या. प्रा. डॉ. रुपाली संकपाळ यांनी विविध शैक्षणिक, रोजगार व व्यावसायिक संधी, ऑनलाईन मार्केटिंग, डिजिटल मार्केटिंगविषयी मार्गदर्शन केले. संयोजिका प्रा. आरती कणिरे यांनी उपक्रमाचा आढावा घेतला.

पुढारी

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑनलाईन परीक्षा आजपासून

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने हिवाळी सत्रातील प्रथम वर्ष प्रथम सत्राच्या एमए. एम.कॉम., एम. एस्सी. एमसीएच्या ऑनलाईन परीक्षांना आजपासून प्रारंभ होणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अंतर्गत एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उशिरा झाली होती. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व रिपीटरच्या ६५ पेपरच्या ऑनलाईन परीक्षा मंगळवारपासून सुरू होणार आहेत. परीक्षेला १३ हजार विद्यार्थी बसणार आहेत. दुपारी १२.३० ते १.३० यावेळेत परीक्षा होतील. ऑनलाईन परीक्षेसाठी अडचणी येतील त्या विद्यार्थांनी विद्यापीठ संकेतस्थळावरील हेल्पलाईनशी संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक पळसे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 MAY 2021 पुण्यनगरी

# जैवविविधता टिकली तरच मानव टिकेल : डॉ. ए. डी. जाधव

## शहाजी महाविद्यालयात जागतिक जैवविविधता दिन कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जैवविविधतेतील वनस्पती, प्राणी, पक्षी जगले तरच पर्यावरणाचा समतोल व मानवी जीवन सुखी आणि समृद्ध होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशन इन सेरिकल्चरचे समन्वयक व महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य डॉ. ए. डी. जाधव यांनी केले.

जागतिक जैवविविधता दिनानिमित्त श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा पर्यावरण विभाग व आयक्यूएसीतर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. सुरुवातीस ज्येष्ठ पर्यावरणवादी नेते डॉ. सुंदरलाल बहुगुणा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

डॉ. जाधव म्हणाले, मानवाने विकासाच्या नावाखाली व आपल्या हव्यासापोटी प्रचंड वृक्षतोड केली आहे. त्यामुळे अनेक पशू-पक्ष्यांचे निवासस्थान धोक्यात आले आहे. याचा परिणाम एकूणच पर्यावरण संतुलनावर होत असून, त्याचे विघातक परिणाम मानवालाच सोसावे लागणार आहेत. वेळीच या धोक्याची जबाबदारी मानवाने घेतली नाही, तर आपण स्वतःच्या विनाशाकडे वाटचाल करत आहोत हे ओळखावे.



डॉ. ए. डी. जाधव

दरम्यान, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. स्वागत, प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख पर्यावरण विभागप्रमुख प्रा. दीपा पाटील यांनी करून दिली, तर आभार आयक्यूएसी समन्वयक डॉ. एन. एस. जाधव यांनी मानले. या ऑनलाईन व्याख्यानाचे तांत्रिक संयोजन प्रा. विशाल पुंदीकर व गणेश पाटील यांनी केले. या व्याख्यानास संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे, प्रबंधक रवींद्र भोसले, अधीक्षक मनीष भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

2 5 MAY 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदव्युत्तर प्रथम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षा आजपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उशिरा झाली होती. त्यामुळे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व रिपीटरच्या ५५ पेपरच्या ऑनलाईन परीक्षा आजपासून (दि. २५) सुरू होणार आहेत. ही परीक्षा सर्वसाधारण १३ हजारपेक्षा जास्त विद्यार्थी देणार आहेत. तर तीन हजार विद्यार्थ्यांनी



ऑफलाईनमधून ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली आहे.

ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये एम. ए., एम. कॉम., एम. एस्सीच्या होणाऱ्या पारंपारिक अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन परीक्षा आजपासून सुरू होणार आहेत. या परीक्षेसाठी ऑनलाईन पर्याय देण्यासाठी १८ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. याचा फायदा घेत ऑफलाईन परीक्षेसाठी अर्ज केलेल्या ३ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेसाठी अडचणी येतील त्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील हेल्पलाईन क्रमांकाशी संपर्क साधावा.